7

# जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतरे

**माणिक चव्हाण**
अर्थशास्त्र विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, जि. बीड (महाराष्ट्र) भारत

## Research Paper - Economics

**प्रस्तावना :**

दिनांक ०४ मे १९९१ रोजी 'द इॅकॉनॉमिस्ट' ह्या पत्रिकेतुन तत्कालीण भारतीय अर्थव्यवस्थेतील परिस्थितीचे वर्णन प्रकाशित करण्यात आले. सदरील पत्रिकेच्या मुखपृष्ठावर 'बंद पिंजऱ्यातील सिंहाचे' चित्र दाखविण्यात आले होते. त्याचे कारण म्हणजे या पत्रिकेला तत्कालीण भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण झालेले आर्थिक संकट दाखवायचे असेल असे वाटते. तसेच पत्रिकेतुन भारताचे भविष्य संकटात सापडले असुन भुतकाळात कधी असे घडले नव्हते, अशी खंतही व्यक्त करण्यात आली. भारतात निर्माण झालेल्या आर्थिक संकटाला पत्रिकेने भारतातील नोकरशाही आणि परवाना पध्दतीस कारणीभुत मानले. पुढे पत्रिकेतुन 'आता निवडणुका होणार'..........'सत्तेवर येणाऱ्या सरकारला आर्थिक संकटाला सामोरे जावे लागणार' ..........'कदाचित सरकारला हे आर्थिक संकट बाध्य ठरणार'...... असाही अंदाज व्यक्त करण्यात आला. आणि वास्तविक पाहता भारताची तत्कालीण वित्तीय परिस्थिती देखील अत्यंत प्रतिकुल होती. इ.स. १९८० मध्ये जागतिक पातळीवर तेलाचे दर वाढल्याने आयात निर्यातीचा मेळ घालणे भारताला अधिकाधिक अवघड होऊन बसले होते. इ.स. १९८५ ते १९८८ या तीन वर्षाच्या काळात १८०० कोटी डॉलर्स खर्च करुन युध्दसामग्री आयात करण्यात आली. आयात निर्यातीतील तुट भरुन काढण्यासाठी शासण परकीय बँकावर अवलंबुन राहु लागले. त्याचा परिणाम म्हणुण आपले परकीय कर्ज १९८५ ते १९९१ या काळात ४१०० कोटी डॉलर्स वरुन ७००० कोटी डॉलर्स म्हणजे एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २५

टक्क्यांपर्यंत वाढले. त्यामधील बहुतेक कर्ज अल्पमुदतीचे आणि काही 'भाग' (शेअर्स) हे अनिवासी भारतीयांनी तीन वर्षासाठी ठेवलेल्या ठेवींचे होते. एप्रिल १९९१ मध्ये जागतिक बँकेने भारतास कर्ज देणाऱ्या राष्ट्रांची बैठक घेऊन, भारतने जागतिक बँकेच्या अटी मान्य केल्याशिवाय त्यांना कुठल्याही राष्ट्रांकडुन कर्ज दिल्या जाऊ नये, असे सांगितले. जागतिक बँकेच्या या धोरणांमुळे कर्जदाराची विश्वासार्हता ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थानी (Rating Agencies) भारताची विश्वासर्हता कमी झाल्याचे जाहीर केले. त्यामुळे एप्रिल ते जुन १९९१ या कालावधीत अनिवासी भारतीयांनी देशातुन ९५.२ कोटी डॉलर्सच्या ठेव्या काढुन घेतल्या. याच कालावधीत देशात लोकसभा निवडणुका झाल्या. श्री. पी.व्ही. नरसिंहराज यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (INC) सत्तेवर आले. २१ जुन १९९१ रोजी श्री. पी.व्ही. नरसिंहराव यांनी देशाचे पंतप्रधानपद स्विकारले. देशाचे आर्थिक संकट दुर करण्यासाठी या नवीन शासणाने 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' (RBI) कडील ६७ टन सोणे विकुन परकीय चलन मिळविले. परंतु त्यातुनही प्रश्न सुटला नाही त्यामुळे भारतास जागतिक बँकेला शरण जाऊन त्यांच्या सर्व अटी मान्य कराव्या लागल्या. त्यांच्या अटीनुसार भारतीय रुपयाचे डॉलरच्या तुलनेत २० टक्क्यांनी अवमुल्यन करावे लागले आणि अन्य वित्तिय व औदयोगिक धोरणात बदल करण्याचे मान्य केल्याने भारतास आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडुन ३ लक्ष ३६ कोटी डॉलर्स कर्ज प्राप्त झाले.

जागतिक बँकेनुसार भारताच्या वित्तीय व औद्योगिक क्षेत्रातील धोरणात जे बदल सुचविण्यात आले होते त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी देशाचे तत्कालीण अर्थमंत्री व सद्यकालीन पंतप्रधान श्री डॉ.मनमोहन सिंग २४ जुलै १९९१ रोजी संसदेत उभे राहिले. तेंव्हा त्यांनी एक नवीन वित्तिय व औद्योगिक धोरण संसदेसमोर सादर केले, ज्यात जागतिक बँकेच्या अटींची पुर्तता करण्यात आली होती. हे नवीन धोरण बहुमताने पास झाले. त्यास काँग्रेस सोबत भाजपाने देखील पाठिंबा दर्शविला. परंतु डाव्या पक्षांनी त्यास विरोध केला. ह्या नवीन धोरणास देशातील अनेकांनी 'नवीन आर्थिक सुधारणा' (New Economic Reforms) असे नाव दिले. दुसऱ्यांच्या दबावाखाली घेतलेल्या निर्णयाला पांघरुण घालुन स्वत:च्या स्वार्थ आणि मोठेपणासाठी सत्यास लपविणे, मग यापेक्षा आपल्यासाठी दुर्देव काय असेल ? हेच या ठिकाणी म्हणावं लागेल. कारण जागतिक बँकेच्या सर्व अटी मान्य करुन नवीन आर्थिक धोरण स्वीकारणे म्हणजे त्या नवीन आर्थिक सुधारणा नसुन तो एक कराररुपी 'तह' होय, हेच या ठिकाणी स्पष्ट होते. आणि तह तेंव्हाच केला जातो, जेव्हा एखाद्याच्या तुलनेत दुसरा कमजोर असेल. मग त्यावेळेस तर भारताची आर्थिक स्थिती ही अत्यंत नाजुक होती हे वरील सर्व आर्थिक घडामोडीवरुन लक्षात येते. म्हणुन या 'तह' रुपी करारातुन भारतास जागतिक बँकेच्या सर्व अटी मान्य कराव्या लागल्या आणि देशाला आपल्या अर्थव्यवस्थेत जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाची प्रक्रिया सुरु करावी लागली हेच यातून स्पष्ट

होते.

**जागतिकीकरणाचा अर्थ :**

"जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था आणि एखाद्या विशिष्ट देशाची अर्थव्यवस्था यांच्या एकत्रीकरणांची प्रक्रिया होय. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत वस्तु व सेवांच्या मुक्त व्यापारावर भर दिला जातो. त्यामुळे जागतिकीकरण म्हणजे वस्तु आणि सेवांच्या व्यापारात वेगाने होणारी वाढ आणि जागतिक बाजारपेठेची निर्मिती होय."

जागतिकीकरणाच्या माध्यमातुन भारतीय अर्थव्यवस्थेत इ. स. १९९१ पासुन खुल्या जागतिक व्यापारास प्रोत्साहन देणे, ५१ टक्क्यापर्यंत थेट विदेशी गुंतवणुकीस (FDI) प्रोत्साहन देणे, निर्यातक्षम उद्योगांत १०० टक्क्यांपर्यंत विदेशी गुंतवणूकीस मान्यता देणे, आयातीवरील प्रशुल्क घटविणे, पारदर्शी खुल्या व्यापारास प्रोत्साहण देणे, देशाच्या अर्थव्यवस्थेचा जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मता साधण्याचा प्रयत्न करणे, इ. आर्थिक धोरणे स्वीकारावी लागली. तसेच शासनाकडुन परवाना घेण्याची पध्दती सुध्दा रद्द करण्यात आली. त्यामुळे कुठल्याही उद्योजकांना कोणत्याही धंद्यात आणि व्यवसायात प्रवेश करण्याची संधी मिळाली परंतु, एखाद्या धंद्यातील सर्व अधिकार एकाच उद्योजकाच्या हातात एकटवु नये यादृष्टीने नेहरुजींच्या काळापासुन आंमलात असलेल्या मक्तेदारी नियंत्रण कायद्यास (MRTP) रद्द करण्यात आले. तसेच प्रत्यक्ष करांमध्ये करमुक्त उत्पादनाच्या मर्यादेत वाढ करुन करांचे दर कमी करण्यात आले, संपत्ती कर रद्द करण्यात आला, भांडवलावरील नफ्यावर असणाज्या करात मोठ्या प्रमाणात कपात करण्यात येऊ लागली. पुढे इ. स. १९९५ मध्ये स्थापन झालेल्या W.T.O. च्या तत्वाचे सुध्दा पालन भारतास करावे लागले आहे. यावरुन लक्षात येईल की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतातील आर्थिक धोरणे उद्योग आणि सेवाक्षेत्रासाठी किती मोठ्या प्रमाणात अनुकुल आणि लवचिक झाली आहेत.

**जागतिकीकरणाची फलश्रुती :**

जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील काही प्रमुख क्षेत्रात स्थितंतरे निर्माण झाली आहेत त्याचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

१) एकुण देशातंर्गत उत्पादण वृध्दीदरात (GDP) वाढ, परंतु ........

भारतात इ.स. १९९१ पासुन जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरु झालेल्या ह्या प्रक्रियेमुळे २१ व्या शतकाच्या सुरुवातीस खऱ्या अर्थाने प्रभाव दिसु लागला. इ.स. १९८०-८१ ते १९९० -९१ या दशकात GDP वृध्दीदर ५.६% होता त्यापुढील दशकात म्हणजे इ.स. १९९०९१ ते २०००-०१ (जागतिकीकरणाचा काळ) या दशकात सुध्दा GDP वृध्दीदर ५.६% इतका कायम राहिला. परंतु इ.स. २०००-०१ ते २०१०-११ ह्या दशकात तो सररासरी ८ टक्क्यांपर्यत पोहोचला आहे, हे आपणास मान्य करावे लागेल. इ.स. २००८ मध्ये

भारतातील सरासरी दरडोई उत्पन्न १०८० डॉलर्स पर्यंत वाढले, देशातील साक्षरता दर २०११ पर्यंत ७५% झाला. ह्या बाबी भारतासाठी गौरवपुर्ण असल्या तरी भारतात अजुनही कुपोषण, दारिद्रय, बेकारी, गलिच्छवस्त्या, प्लॅस्टिक घनकच-याचा प्रश्न, भष्टाचार, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न इ. अनेक समस्या उग्र रुप धारण करीत आहेत.

१. अलिकडेच प्रकाशित झालेल्या डॉ. सी.एन.सक्सेणा समितीच्या अहवालानुसार देशातील ग्रामीण भागात दारिद्रयरेषेखाली जीवन जगणाऱ्यांचे प्रमाण अजुनही ५०टक्क्यापर्यंत आहे हे स्पष्ट झाले आहे.

२. 'सिटीझण्स अलायन्स अगेण्स्ट मान्युट्रीशण' या स्वंयसेवी संस्थेच्या पुढाकारातुन नांदी फाऊंडेशनंच्या वतीने कुपोषणाबाबत जानेवारी २०१२ मध्ये एक अहवाल सादर करण्यात आला आहे. नांदी फाऊंडेशनच्या वतीने देशातील झारखंड, मध्य प्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, राज्यस्थाण आणि उडिसा या सहा राज्यातील १०० निवडक जिल्ह्यात कुपोषणाबाबत सर्वेक्षण करण्यात आले. या अहवालानुसार सहा राज्यातील १०० जिल्ह्यांत १ ते ५ वर्षाखालील ४२% मुले कुपोषित, ९२% मातांना पोषणा बाबत नसलेली माहिती आणि ५९% मुलांना खावे लागणारे निकृष्ट अन्न; अशा चिंतनीय बाबी समोर आल्या आहेत. ही चिंतनीय बाब लक्षात घेऊन देशाचे पंतप्रधान आणि जागतिकीकरणाचे प्रवर्तक श्री. डॉ. मनमोहन सिंग यांनी कुपोषण देशाला 'राष्ट्रीय कलंक' आहे, असे उद्गार काढले. आणि नेहमी आर्थिक धोरणावर आणि औद्योगिक नितीवर बोलणारे भांडवलवादी अर्थशास्त्रज्ञ व देशाचे पंतप्रधान श्री. डॉ. मनमोहन सिंग यांनी इतिहासात पहिल्यांदाच "शिक्षण, आरोग्य, मलनि:सारण, सामाजिक स्वास्थ, पिण्याचे पाणी आणि पोषण अशा एकमेकांत गुतलेल्या सर्व मुद्दयांचा विचार करुन त्यानुरुप मोहिमांची आखणी करावी लागेल" असा समाजवादी दृष्टीकोण मांडला.

३. देशात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतुन जलद औद्योगिकीकरण आणि त्यातुन शहरांचे विस्तारीकरण वाढत चालले आहे. परंतु शहरीकरणाच्या नावाखाली झोपडपट्टी व गलिच्छ वस्त्या निर्माण होत असुन त्यातुन अनेकविध सामाजिक समस्या, गुन्हेगारी, आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. शहरीकरणाच्या नावाखाली शहरे बकाल आणि गलिच्छ होत चालली आहेत. देशातील प्रत्येक शहरात प्लॅस्टिक घनकचज्याचा प्रश्न दिवसें-दिवस उग्र रुप धारण करीत आहे.

४. भारताच्या वाढत्या आर्थिक विकासाबरोबर देशात भ्रष्टाचार दिवसें-दिवस उग्र रुप धारण करीत आहे. स्वातंत्र्याच्या ६५ वर्षाच्या इतिहासात पहिल्यांदाच भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली चार विद्यमान खासदार, दोन केंद्रीय कॅबिनेट मंत्री आणि अनेक उद्योजक जेरबंद झाली.

देशात मागील काळात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची नाचक्की झाली आहे. त्याचबरोबर श्री. अण्णाहजारे यांच्या माध्यमातुन लोकांच्या कल्याणासाठी आणि देशातील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी जो लोकपाल विधयकासाठी लढा उभारला गेला, त्यास शांतीप्रिय मार्गाने मिळालेला असंख्य लोकांचा पाठिंबा ह्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर Transparency International या संस्थेच्या वतीने ठरविल्या जाणाऱ्या ईमानदार देशाच्या यादीत भारताचे स्थान २०११ मध्ये ९४ पर्यंत खाली घसरले. ते स्थान २००७ मध्ये ७२ आणि २०१० मध्ये ८७ असे होते.

**२) बहुराष्ट्रीय कंपण्यांचे वर्चस्व :**

नवीन अर्थिक धोरणानुसार थेट विदेशी गुंतवणूकीस (FDI) ५१% पर्यंत मिळालेली सुट तसेच निर्यातक्षम उद्योगात १०० % विदेशी गुंतवणुकीस मिळालेली मान्यता यामुळे देशातील अनेक लहान मोठ्या कंपण्यांनी बहुराष्ट्रीय कंपण्यामुळे गुडघे टेकले आहेत. देशात आज प्रत्येक क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपण्यांनी शिरकाव केला आहे. परकीय भांडवलाच्या माध्यमातुन भारतातील कंपण्यांचे विलिणीकरण व खरेदी या संदर्भात शासण अधिकृत माहिती प्रसिध्द करीत नाही. परंतु अनधिकृत बातम्यांवरुन परकीय भांडवलापैकी बहुतेक भांडवल भारतीय उद्योग ताब्यात घेण्यासाठी वापरले जात आहे, असे स्पष्ट होते. 'हिंदुस्थाण युनिलिव्हर' या बहुराष्ट्रीय कंपणीने इ.स. १९९४ मध्ये 'टाटा ऑईल मिल' आणि इ.स. १९९५-९६ मध्ये 'लक्मे' कंपणी खरेदी केली. जर MRTP ॲक्ट शिथिल झाला नसता तर हे शक्य झाले नसते. त्यानंतर हे सत्र जोरात सुरु होऊन भारतातील 'पार्ले' कंपणी 'कोकाकोलाने', 'डयुक' कंपणी 'पेप्सी' या बहुराष्ट्रीय कंपण्यांनी विकत घेतल्या. २१ व्या शतकातील पहिल्या दशकात तर 'हिंदुस्थाण युनिलिव्हर' या बहुराष्ट्रीय कंपणीने संपुर्ण भारतावर अधिराज्य प्रस्थापित केले आहे. तसेच बहुराष्ट्रीय कंपण्यानी ज्या कंपण्या विकत घेतल्या त्या विकणा-यांना फार थोडी रक्कम दिली जाते. कारण सौदे मोठ्या रक्कमेचे असतील तर SEBI ने ठरविल्या प्रमाणे त्यांचे जाहिर सौदे करावे लागतील आणि त्यामुळे त्यांची माहिती जाहीर होईल. बहुराष्ट्रीय कंपण्या देशातील लहान-लहान कंपण्या विकत घेऊन आपले क्षेत्र वाढवत आहेत. सौदे छोट्या रक्कमेचे असल्याने शासकीय यंत्रणा व लोकांचे त्याकडे लक्ष जात नाही. देशात आज अन्न प्रक्रिया, सौंदर्यप्रसाधणे, इलेक्ट्रॉनिक्स, वाहतुक, औषधी वस्तु उत्पादणे इ. क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपण्यानी शिरकाव केल्याने देशातील लघुउद्योग, मध्यम उद्योग व गावागावातील कुटीर उद्योग ह्यांचा ऱ्हास होत आहे.

तसेच भारतातील स्थानिक बँका परदेशी कंपण्याना कर्ज पुरवठा करीत असलेल्या अनेक बाबी मध्यंतरीस उघडकीस आल्या आहेत. अ) 'लाफार्ज ' या MNCs ने नोव्हेंबर १९९९ मध्ये ५५०

कोटी रुपयास 'टाटा इंडस्ट्रिज स्टील' कंपणी विकत घेतली. त्यातील २१५ कोटी रुपये ICICI व इतर रक्कम SBI आणि HDFC बँकेकडुन कर्जाने घेतली. ब) ऑक्टोंबर १९९८ मध्ये इलेक्ट्रोलक्स ए.बी. ह्या MNCs ने White Goods Business मध्ये 'व्होल्टाज' चा ७५% भाग खरेदी केला. त्यासाठी त्यांना १६० कोटी रुपये लागले. त्यातील १०० कोटी रुपये ICICI या वित्तीय संस्थेकडुन मिळाले. याचा अर्थ असा की, कंपण्या भारतातल्याच ........... पैसा भारतातलाच ............. आणि मालकी परकीयांची ! मग हे दुसरे पारतंत्र्य नव्हे का ? असा प्रश्न आपल्या समोर उभा राहतो.

**३) भारतीय संस्कृतीचे विकृतीकरण :**

सध्याचे युग हे 'जाहिरातीचे युग' समजले जाते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जाहिरातीचे महत्व इतक्यासाठीच आहे की, उद्योजकाला आपली उत्पादणे ही प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक्स मिडीयाच्या माध्यमातुन थेट लोकांपर्यत नेण्यास मदत होते. त्यातुन ग्राहक प्रभावित होऊन त्यांच्या वस्तू उत्पादनाला चांगली मागणी निर्माण व्हावी आणि वस्तुचा खप वाढावा एवढ्या साठीच जाहिरातीचे महत्व असते. परंतु या जागतिकीकरणाच्या काळात जाहिरातींच्या स्पर्धेमुळे त्यातील 'लैंगिगता' आज एका अभुतपुर्व टोकाला पोहोंचली आहे. नफ्याच्या आशेने स्त्रिच्या शरीराचे विचित्र पध्दतीने प्रदर्शन होत असलेले दिसुन येत आहे. निरनिराळे रिॲलिटी शो, फेस्टीवल्स, चित्रपट, फॅशन शो, यांचा देखील हाच उद्देश दिसुन येतोय. ह्यामुळे निश्चितच भारतीय सांस्कृतीक मुल्यांचा ऱ्हास होत आहे. सिनेमा, टि.व्ही. , इंटरनेट च्या माध्यमातून संस्कृतीचे संवर्धन होणे तर सोडुन द्या ....... परंतु सभ्य अशा भारतीय संस्कृतीची लक्तरे वेशीवर टांकण्याचे काम सध्या चालु आहे. "भारतीय संस्कृतीला विकृत करण्याचे काम परकीयांच्या अनेक आक्रमणातुनही कधी शक्य झाले नाही. परंतु काही वर्षातच इलेक्ट्रॉनिक मिडीया व सिनेमा यांच्यातील पैसा कमावण्याच्या स्पर्धेमुळे ते चालु आहे असेच म्हणावे लागेल". यातुन सामाजिक जबाबदारी आणि मानवी मुल्ये यांचा ज्हास होऊन एक नैतिक पोकळी निर्माण होत आहे. साहजिकच मनोरंजन, विश्रांती, जनजागृती, सामाजिक परिवर्तन, प्रबोधन, इ.साठी असणारी प्रसारमाध्यमे जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक युगात लैंगिक वासना व विकृती यामध्ये आडकत चालली आहेत, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. त्यामुळे जगात श्रेष्ठ अशा भारतीय संस्कृतीचे संक्रमण व संवर्धन कसे होणार ? असा प्रश्न याठिकाणी निर्माण होतो. तसेच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत साधनांच्या अतिरेकी वापरामुळे लोकांना एकत्र टिकवुन ठेवणाज्या भारतीय सामाजिक प्रथा, परंपरा आणि सामाजिक बांधिलकीची भावना यांचा लोप होत चालला आहे. यातुन माणसा-माणसातील 'माणुसकी' नष्ट होवून माणुस-माणसापासुन दुर होत चालला आहे, हे निश्चत.....

**४) भारतीय शेती आणि शेतकरी यांच्या समोर निर्माण झालेली आव्हाने :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय शेती आणि शेतकऱ्यांच्या समोर निर्माण झालेली

काही आव्हाणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

**अ) अन्नधान्याच्या उत्पादनात घटत्या दराने वाढ :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारताच्या कृषीक्षेत्रातील अपेक्षेप्रमाणे गुंतवणुक झाली नाही. त्यामुळे नवीन आर्थिक धोरणाच्या नावाखाली उद्योग व सेवा क्षेत्राच्या तुलनेत कृषीक्षेत्राकडे दुर्लक्ष झाले.

इ.स. १९८० -८१ ते १९९०-९१( जागतिकीकरण पुर्वकाळ), इ.स. १९००-९१ ते २०००-०१ आणि इ.स. २०००-०१ ते २०१०-११ (जागतिकीकरण काळ) या तीन दशकातील अन्नधान्य उत्पादनवृध्दीदराचा आढावा घेतल्यास जागतिकीकरणाचा भारतीय अन्नधान्य उत्पादन वृध्दीदरावर कसलाही अनुकूल परिणाम घडुन आलेला दिसुन येत नाही. इ.स. १९८०-८१ मध्ये भारताचे एकुण अन्नधान्य उत्पादन १२९.६ दशलक्ष टन होते. ते वाढुन इ.स. १९९०-९१ मध्ये १७६.४ दशलक्ष टन झाले याचा अर्थ इ.स. १९८०-८१ ते १९९० -९१ या दशकात अन्नधान्य उत्पादनात १.३६ पट वाढ झाली. पुढे इ.स. २०००-०१ मध्ये एकुण अन्नधान्य उत्पादन १९६.८ दशलक्ष टन होते. त्यामुळे इ.स. १९९०-९१ ते २०००-०१ या दशकात अन्नधान्याच्या उत्पादनात १.१ पट वाढ झाली. तर इ.स. २०१०-११ मध्ये अन्नधान्य उत्पादन २४१.६ दशलक्ष टन झाले, त्यामुळे इ.स. २०००-०१ ते २०१०-११ या दशकात अन्नधान्याच्या उत्पादनात १.२ पट इतकी वाढ झाली आहे, जी इ.स.१९८०-८१ ते १९९०-९१ (जागतिकीकरण पुर्वकाळ) या दशकातील वाढी पेक्षा कमी आहे. याचाच अर्थ असा की, नवीन आर्थिक धोरणांचा आणि जागतिकीकरणाचा अन्नधान्य उत्पादन वाढीवर अनुकूल परिणाम झालेला दिसुन येत नाही.

**ब) कृषी निर्यातीत घट :**

जागतिकीकरणानंतर भारताच्या कृषी निर्यातीत वाढ होईल असे वाटत असतांना तसे घडले नाही. इ.स. १९९०-९१ देशाच्या एकुण निर्यातीत कृषी क्षेत्राचा वाटा १८.५% होता. तो वाटा २०००-०१ मध्ये १४.०२% आणि २००८-०९ मध्ये ९.३% इतका राहिला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत WTO च्या तत्वाचे पालन विकसनशील देशाने केल्याचे दिसुन येते. WTO च्या तत्वानुसार विकसित देशांनी आपल्या देशातील शेतीसंबंधित अनुदान ६ वर्षात २० टक्क्यांनी कमी करणे आणि विकसनशील देशांनी शेती संबंधित अनुदान १० वर्षात १३ टक्क्यांनी कमी करण्याचे ठरले. परंतु विकसित देशांनी WTO च्या तत्वांना 'केराची टोपली' दाखवत Green व Blue बॉक्सेस च्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आपल्या देशातील शेतकज्यांना अनुदाने देत राहिली. परिणामी तेथील उत्पादन खर्च कमी होवून आंतरराष्ट्रीय स्तरावर शेतमालाच्या किंमती कमी होऊ लागल्या आणि तुलनात्मक दृष्ट्या WTO च्या तत्वाचे पालन केल्याने भारतातील शेतमालाचा उत्पादन खर्च विकसीत देशापेक्षा अधिक होऊ लागल्याने भारतातील शेतमालाच्या किंमती आंतरराष्ट्रीय

स्तरापेक्षा जास्त राहु लागल्या. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय मालास योग्य किंमतीच्या बाजारपेठा उपलब्ध होत नाहीत. तसेच केंद्र शासनाकडून शेतीतील उत्पादनाला ऐन हंगामावेळी निर्यातबंदी आणि विदेशी कृषी मालाची आयात यामुळे देशातील शेतकरी निश्चितच अडचणीत सापडला आहे. त्यामुळे इ.स. १९९१ नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतीकडे निश्चितच दुर्लक्ष झाले आहे, असेच म्हणावे लागेल.

**क) देशातील शेतकरी संकटात :**

जागतिकीकरणामुळे दारिद्र्यास नवनवीन दिशा प्राप्त होत आहेत. त्यामधुन भारत देश आर्थिक विषमतेच्या विळख्यात सापडत आहे. ज्यांच्याजवळ जमिन, भांडवल, नौकरी, सामाजिक सुरक्षितता नाही असे लोक बाजारपेठेच्या बाहेर फेकले जात आहेत. देशात ६०% शेती कोरडवाहु आहे. हे निश्चित की, कोरडवाहू शेतकऱ्यांपैकी काहींची परिस्थिती जेमतेम आणि अनेकांची परिस्थिती बिकट आहे. ज्यांच्या पाशी बागायती शेती आहे, त्यांची परिस्थिती साधारणपणे बरी आहे परंतु, समाधानकारक म्हणता येणार नाही. देशात आज बी-बियाणे, रासायनिक खते, मजुरीदर, लागवड व वाहतुक खर्च गगणाला (अतिउच्च) असतांना शेती उत्पादनाला नसलेली योग्य किंमत या अजब-गजब समीकरणामुळे सध्या देशातील शेतकरी विशेषत: कोरडवाहु शेतकरी निश्चीतच अडचणीत सापडला आहे. जंगले, जमिनी, खनिजे, नद्या, जलाशये, पर्वते ही पुर्वीपासुन कोणत्याही देशाची संपती ओळखली जाते. पण देशातील विकासासाठी त्यांचा आज तत्परतेने आणि वेगाने वापर होत आहे त्यामुळे हा विकास 'विनाशकारी' वाटेकडे तर जात नसेल ना ? अशा प्रकारची एक भिती वाटत आहे. नव्या विकासातून पाणी आणि विजेची मागणी वाढत आहे. मग पाण्यासाठी धरणे तर विजेसाठी विजकेंद्रे अत्यावश्यक आहेत. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी आणि आदिवासीयांची जंगले हस्तगत करावी लागत आहेत. त्यामुळे देशातील शेतकरी आणि आदिवासी आपल्या शेती आणि जंगलापासुन वंचित होत आहेत.

जागतिकीकरणाच्या नावाखाली देशातील उद्योग क्षेत्रातील परवाना पध्दती रद्द करण्यात आली. तसेच MRTP ॲक्ट ही रद्द करण्यात आला. त्याचबरोबर कंपण्याच्या नफ्यावरील कर मोठ्या प्रमाणात कमी करण्यात आले, केंद्रीय उत्पादन शुल्कात सुट देण्यात आली, निर्यातक्षम उद्योगात १००% विदेशी गुंतवणुकीस मान्यता देण्यात आली आणि त्यामुळे देशातील मुठभर उदयोगकांना 'करोडो-अब्जो' रुपयांच्या आर्थिक सवलती दरवर्षी दिल्या जात असुन आणि फक्त एकाचवेळेस देशातील शेतकऱ्यांचे ७२००० कोटी रुपयाचे कर्ज माफ केले तर शासन त्याचा गवगवा अजुन कित्येक पिढ्या करेल, ह्यात कुठलेही दुमत नाही.

सेझ (SEZ) प्रकल्पाच्या नावाखाली शासण शेतकऱ्यांच्या हजारो हेक्टर्स जमिनी मुठभर हितचिंतक व नातेवाईक उदयोजकांना कवडीमोलाने देत आहे. तसेच त्यातील उत्पादनावर ५ ते

१० वर्षांपर्यंत १००% करसवलत आणि दुसरीकडे मुक्त व्यापार धोरण स्वीकारल्या नंतर देखील ऐन हंगामात शेती उत्पादणावर निर्यात बंदी................. आणि पुढे शेतकज्यांच्या आंदोलनानंतर जर निर्यातबंदी उठलीच तर ................. भरमसाठ निर्यात शुल्क आकारला जातो. तसेच 'मावळ' सारख्या ठिकाणी पिढ्यानं-पिढीच्या शेतीच्या रक्षणासाठी उतरलेल्या शेतकऱ्यांवर केला जाणारा 'सिनेस्टाईल' गोळीबार.........यामुळे आपल्या समोर प्रश्न पडतो की, जागतिकीकरणाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था खरचं ०शेतीप्रधान राहिली आहे का ? जागतिकीकरणाच्या नावाखाली देशातील मुठभर उद्योजकांना पोचण्याचे काम शासण आपल्या स्वार्थी नितीतुन करतांना दिसुन येतयं आणि शेतकऱ्यांना आपल्या जमिनी कवडीमोलाने विकण्यास भाग पाढतयं, हेच म्हणावे लागेल.

एकीकडे देशातील उद्योजकांना (औरंगाबाद) मर्सडीज कार खरेदी करण्यासाठी ७% व्याजदरावर कर्ज आणि दुसरीकडे शेतकऱ्यांना ट्रॅक्टरर्स खरेदीसाठी १२% व्याजदारावर कर्ज दिले जाते. मग ही ह्या शेतीप्रधान देशातील शेतकज्यांची आर्थिक पिळवणुक नव्हे तर काय होय ? खरेतर देशाची अर्थव्यवस्था शेतीप्रधान असतांना शेतकऱ्यांनी आत्महत्याच का कराव्या ? देशात कधी असे ऐकावयास मिळाले नाही की, एखाद्या उद्योजकाने आत्महत्त्या केली आहे.! देशातील बहुसंख्य लोकसंख्या शेतीवर अवलंबुन असतांना शासन जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारतातील शेतकज्यांची मुस्कटदाबी करतांना दिसुन येतयं .......हेच म्हणावे लागेल.

**निष्कर्ष :**

१) जागतिकीकरणानंतर जरी देशाचा जलद आर्थिक विकास साधला असला तरी देशात दारिद्रय, आर्थिक विषमता, कुपोषण, प्लॅस्टीक घनकचरा, शहरांतील गलिच्छ वस्त्या आणि झोपडपट्ट्या, गुन्हेगारी इ. प्रश्न उग्र रुप धारण करीत आहेत.

२) WTO च्या धोरणामुळे भारतातील शेतकऱ्यांवर निश्चितच अन्याय होत आहे. एकतर विकसित देशातील छुप्या अनुदानामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर शेतमालाच्या किंमती कमी असल्याने भारतातील कृषी निर्यात घटत चालली आहे. त्याचबरोबर देशात काही मुख्य शेती पिकांवरील निर्यात बंदी व निर्यात शुल्क जास्त असंल्याने देशातील शेतकरी अडचणीत सापडत आहे. एकीकडे उत्पादन खर्च अतिउच्च आणि शेती मालास नसलेली योग्य किंमत यामुळे देशातील शेतकऱ्यांवर एक नविन आर्थिकं संकट निर्माण झाले आहे.

३) नवीन आर्थिक धोरणामुळे बहुराष्ट्रीय कंपण्या भारतातील बाजारपेठा काबीज करीत आहेत. त्याचा प्रतिकुल परिणाम देशातील लघु, मध्यम आणि कुटीर उद्योगावर पडत आहे.

४) जागतिकीकरणाच्या काळात जाहिरातीचे नवे विश्व निर्माण होऊन अधिकाधिक नफ्याच्या आशेने प्रसारमाध्यमावर स्त्रिच्या शरीराचे विचित्र पध्दतीने चित्रीकरण करुन ग्राहक

आकर्षित करण्याची एक विकृत पध्दती निर्माण झाली आहे. देशातील काही टि.व्ही. चॅनल्स, रिॲलिटी शो, चित्रपट, जाहिराती यातुन भारतीय संस्कृतीला वेशीवर टांगण्याचे कार्य सुरु आहे. यातून भारतीय समाजाला एकत्र घट्ट करुन ठेवणाऱ्या प्रथा, परंपरा आणि सामाजिक बांधिलकीची भावना लोप पावत आहे. आणि त्यामुळे समाजात नैतिक पोकळी निर्माण होऊन भारतीय सांस्कृतीक मुल्यांचा ऱ्हास होत आहे.

**समारोप :**

वरील सर्व विवेचनावरुन असे लक्षात येते की, भारतीय अर्थव्यवस्था जरी शेतीप्रधान असली तरी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शासणाची धोरणे उद्योगप्रधान होत चालली आहेत. म्हणुन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मुठभर उद्योजक मालामाल आणि देशातील बहुतांश शेतकरी हताश, निराश, आणि हवालदिल दिसुन येत आहेत. म्हणुण पुढे चालुन एखाद्या पत्रिकेने जर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय शेतकऱ्याचे वर्णन करावयाचे ठरविले तर त्यास 'बंद पिंजऱ्यात' दाखवणार नाहीत, एवढीच एक अपेक्षा व्यक्त करुया. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे देशातील शेती व शेतकऱ्यावर जो अन्याय होत आहे, त्यासंदर्भात शासणाने 'भारतीय शेती व शेतकरी' यांना डोळ्यासमोर ठेवून भारतीय शेतीसाठी भरीव आर्थिक तरतुद करावी. त्याचबरोबर भारतीय शेतीसाठी अनुकुल असे कृषी आयात-निर्यात धोरण आंमलात आणावे जेणेकरुन भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक कल्याणात वाढ होईल.

## संदर्भ सूची :-

१. Indian Economy - Gauray Datta & Ashiwani Mahajan, S.Chand & Company Ltd. New Delhi.
२. भारतीय अर्थव्यवस्था - प्रतियोगिता दर्पण, आग्रा.
३. भारतीय अर्थशस्त्र ,विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र - डॉ. जी. एन. झामरे
४. विश्व व्यापार संघटन- पि.के. वासुदेव
५. जागतिकीकरण - नलिनी पंडीत.
६. भारत विकास की दिशाएँ- डॉ.अमर्त्य सेन
७. कृषी अर्थशास्त्र - डॉ. जे.पी. मिश्र
८. दै. लोकमत -१५ मार्च २०१२
९. द हिंदु -२७ डिसेंबर २०१०, पी. साईनाथ

२०१८-१९ डॉ. दत्ता दास.


IMPACT FACTOR 5.60

ISSN 2348- 5825

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for All Subjects


# INDO ASIAN PHILOSOPHER


UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCHJOURNAL

Issue : XII, Vol. II

Year- VI, Bi-Annual(Half Yearly)

(Oct. 2018 To Mar. 2019)

Editorial Office :

'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Website**

**www.irasg.com**

Contact : - 02382 - 241913
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

E-mail :
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
Indo Asian Publication,
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-



EDITOR IN CHIEF

Dr. Pramod G. Kalam
Dept. of Commerce,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.) India

EXECUTIVE EDITORS

Dr. Ambuja Malkhedkar
Gulbarga, Dist. Gulbarga
(Karnataka)

Dr. Balaji G. Kamble
Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur ( M. S.)

DEPUTY EDITOR

Dr.M. B. Karajgi
Head, Dept. of English,
Smt. Sushiladevi Deshmukh College,
Latur, Dist. Latur (M.S.)

Dr. M. G. Babare
Head, Dept. of Zoology
A. S. C. College,
Naldurg, Dist. Osmanabad (M.S.)

CO - EDITOR

Dr. Mahadev S. Kamble
Dept. of History,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Vanita S. Jadhav
Madar Terisa B.Ed. College,
Dharwad, Dist. Dharwad
( Karnataka)

MEMBER OF EDITORIAL BOARD

Dr. Balasaheb S. Patil
Head, Dept. of Economics,
C. K. T. College,
Panvel, Dist. Raigarh (M.S.)

Dr. Sudhir Gavhane
Head,Dept. of Economics,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Dr. Mohmmad T. Rahaman
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

Dr. Kiran Khandare
Dept. of English,
Shivaji College,
Akola, Dist. Akola ( M.S. )

Dr. Bhaskar S. Wazire
Head, Dept. of History,
Sitabai Arts College,
Akola, Dist. Akola (M. S.)

Prashant B.Kshirsagar
Dept. of Marathi,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Dr. Sivvappa Rasapali
Dept. of Chemistry,
UMASS, Dartmouth,
MA (United States)

Dr. P. M. Band
Dept. of Dept. of Chemistry,
College of Eng. & Technology,
Babhulgaon, Dist. Akola (M. S.)

IMPACT FACTOR
5.60

ISSN 2348-5825
Indo Asian Philosopher (IAP)
Issue : XII, Vol. II
Oct. 2018 To Mar. 2019
www.irasg.com

**Research Paper** 13 **Economics**

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या : कारणे व उपाय

**डॉ. एम. एच. चव्हाण**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, ता.जि. बीड

**प्रस्तावना :-**

भारतातील विविध राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या हा अतिशय चिंतेचा आणि चिंतनाचा विषय झालेला आहे. महासत्तेकडे वाटचाल करणाऱ्या देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या ही समस्या गंभीर स्वरुप धारण करीत असून समाजापुढे एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे. ब्रिटिशांच्या १५० वर्षाच्या राजवटीत जेवढ्या आत्महत्त्या झाल्या नाहीत तेवढ्या गेल्या २० वर्षात झाल्या आहेत. सन १८३० ते १९०९ या दरम्यान भारतात २२ भीषण दुष्काळ पडले होते. त्यावेळी शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या नाहीत. सन १९५० या दशकात गोरवाला समितीच्या अभ्यासानुसार शेतकरी गावातील सावकाराकडे कर्जबाजारी असत पण तेव्हा शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या नाहीत. परंतु गेल्या २० वर्षात जवळपास देशात ३ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. विशेष म्हणजे या आत्महत्त्या तुलनेने पुढारलेल्या कर्नाटक, आंध्रप्रदेश, केरळ, ओरिसा, महाराष्ट्र या सारख्या प्रगत राज्यात झालेल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येची कारणे व त्यावरील उपायांचा आढावा घेण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

१. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचा अभ्यास करणे.
२. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येच्या कारणांचा अभ्यास करणे.
३. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या रोखण्यासाठी उपाय सूचविणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम तथ्य संकलनावर आधारीत असून यामध्ये विविध संदर्भग्रंथ, मासिके, विविध अहवाल, वर्तमानपत्रातील लेख, संकेतस्थळे, संशोधन लेख इत्यादींचा आधार घेतला आहे.

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती :-**

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा व ग्रामीण जीवनाचा मुख्य आधार हा शेती आहे. महाराष्ट्र राज्य हे

देशातील औद्योगिकदृष्ट्या प्रथम क्रमांकाचे राज्य आहे. मात्र राज्यातील शेती व्यवसाय देशातील इतर प्रगत राज्याच्या तुलनेत खुप मागे आहे. महाराष्ट्रातील शेती व्यवसाय प्रामुख्योन कोरडवाहू असून नैऋत्य मोसमी पावसावर अवलंबून आहे. शेती व्यवसाय आणि जलसिंचन याचे अतूट नाते असते.

महाराष्ट्रातील शेतीस बारमाही पाणीपुरवठा करणाऱ्या जलसिंचनाच्या सोयी अतिशय अल्प प्रमाणात उपलब्ध असल्याने आजही महाराष्ट्रातील शेती व्यवसाय मान्सूनच्या लहरीपणावर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील १४८ तालुके अवर्षणाच्या विळख्यात आहेत म्हणून दुष्काळाच्या संकटाला सतत शेतकऱ्याला सामोरे जावे लागते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात महाराष्ट्रात राष्ट्रीयकृत बँकांचा शाखाविस्तार, सरकारी धोरणानुसार त्यांनी सुरु केलेला कर्ज पुरवठा, सहकारी बँकाच्या माध्यमातून होणारा कर्ज पुरवठा इत्यादी परिस्थितीत सुधारणा झाली असली तरी शेतकऱ्यांचे सावकाराकडून कर्ज घेण्याचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही. बिनकिफायतशीर किंमती, उत्पादन व उपभोग खर्चात झालेली वाढ इ. कारणांमुळे महाराष्ट्रातील शेतकरी खुपच आर्थिक अडचणीत सापडला आहे. शेतीच्या नवीन उत्पादन तंत्राचा फायदा लहान / सिमांत शेतकरी यांना घेता आला नाही. त्यामुळे त्यांची परिस्थिती तर आणखी बिकट झालेली आहे. वेळेवर पुरेसा व अल्पदरात कर्ज पुरवठा उपलब्ध होणे, शेती आदानाच्या वाढत्या किंमती, मुलाचे शिक्षण, लग्न, घरगुती खर्चातील वाढ यासाठी घेतलेल्या कर्जाचे ओझे कधीच कमी होत नाही. शेतकऱ्यांच्या धारणक्षेत्राचा लहान आकार, अनियमित पर्जन्यमान, कृषीमाल विक्री व्यवस्थेतील दोष, चूकीचे शासकीय धोरण, पुरक व्यवसायाचा अभाव इत्यादींमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत फारसा फरक पडलेला दिसून येत नाही. परिणामी शेतकरी कर्जबाजारी होऊन दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकत चालला आहे. यातून बाहेर येण्याचे सर्व मार्ग जेव्हा बंद झालेले आहेत असे दिसले तेव्हा शेतकरी आत्महत्त्या सारख्या अमानवी मार्गाचाअवलंब करत असल्याचे दिसून येते.

आधुनिक काळात जीवन जगत असताना कुटुंबाची जबाबदारी, सामाजिक प्रतिष्ठा जोपासताना आर्थिक समस्यामुळे निर्माण होणारा न्यूनगंड, यामुळे आलेले नैराश्य, खर्च आणि उत्पन्न यामध्ये मेळ बसत नसल्यामुळे भौतिक आणि मानसिक समाधान शेतकऱ्याला मिळत नाही. शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन व विश्लेषण करणाऱ्या रॉयल कमीशनने म्हणले आहे की, "भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो आणि कर्जातच मरतो." शेतकऱ्यांची ही स्थिती जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत आत्महत्त्या थांबणार नाही.

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या :-**

महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जात होते. औद्योगिक क्षेत्रातही महाराष्ट्र अग्रेसर होते. परंतु आजची परिस्थिती अतिशय विपरीत झाली आहे. आत्महत्त्या करणाऱ्या शेतकऱ्याचे राज्य म्हणून महाराष्ट्राची देशात ओळख झाली आहे. महाराष्ट्राची ही ओळख निश्चितच भूषणावह नाही. विदर्भ, मराठवाडा या भागात आत्महत्त्येचे प्रमाण मोठे आहे. पश्चिम महाराष्ट्रासारख्या सधन भागातही आत्महत्त्येचे प्रमाण वाढत आहे. आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय वाईट असून त्यामुळे आलेल्या नैराश्यातून शेतकरी आत्महत्त्येचा मार्ग पत्कारत आहे. सन १९९५ ते २०१५ या काळात महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्त्येची आकडेवारी पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या (सन १९९५ ते २०१५)

| अ.क्र. | वर्ष | आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या | अ.क्र. | वर्ष | आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९९५ | १०८३ | १२ | २००६ | ४४५३ |
| २ | १९९६ | १९८१ | १३ | २००७ | ४२३८ |
| ३ | १९९७ | १९१७ | १४ | २००८ | ३८०२ |
| ४ | १९९८ | २४०९ | १५ | २००९ | २८७२ |
| ५ | १९९९ | २४२३ | १६ | २०१० | ३१४१ |
| ६ | २००० | ३०२२ | १७ | २०११ | ३३३७ |
| ७ | २००१ | ३५३६ | १८ | २०१२ | ३७८६ |
| ८ | २००२ | ३६९५ | १९ | २०१३ | ३१४६ |
| ९ | २००३ | ३८३६ | २० | २०१४ | ५६५० |
| १० | २००४ | ४१४७ | २१ | २०१५ | ३२२८ |
| ११ | २००५ | ३९२६ | | एकूण | ६९६२८ |

Source : NCRB Report २०१४, २०१६

वरील तक्त्यामधील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, १९९५ ते २०१५ या कालावधीत महाराष्ट्र ६९६२८ शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. याच कालावधीत भारतात २,९६,४३८ एवढ्या शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. १९९५ नंतर देशात आणि राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येच्या प्रमाणात वाढत होत असल्याचे दिसून येते.

राज्यात वारंवार पडणारे दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे उत्पादनात होणारी घट, वाढता उत्पादन खर्च आणि शेतमालाच्या किंमतीतील अनिश्चितता यामुळे वाढणारा कर्जबाजारीपणा इत्यादी कारणामुळे शेतकरी आत्महत्त्येचा मार्ग अवलंबत आहे. जागतिकीकरणामुळे भारतातील विपणन व्यवस्थेवर प्रतिकुल परिणाम झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात फारशी वाढ झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे १९९५ नंतर आत्महत्त्येच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येची कारणे :-**

आत्महत्त्या ही व्यक्तीच्या मानसिक नैराश्येपोटी घडणारी वैयक्तिक कृती असल्याने त्यासाठी जबाबदार असणाऱ्या घटकाची निश्चिती करणे अवघड आहे. तसेच ती कृती एकाच कारणापुरती मर्यादित नसते. परंतु शासनाने नियुक्त केलेल्या अभ्यासगटाने शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे प्रमुख कारण कर्जबाजारीपणा सांगितले आहे. याशिवाय इतर जी कारणे सांगता येतील ती पुढील प्रमाणे आहेत.

**१. नैसर्गिक आपत्ती :-**

भारतीय शेती मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. नैसर्गिक आपत्ती नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी हात धुवून लागते. दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, पिकावरील रोगराई, गारपीट इत्यादीमुळे पीक नष्ट होऊन शेतीतून उत्पन्न न मिळाल्यामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्त्या होत आहे.

**२. वाढता उत्पादन खर्च :-**

अलिकडील काळात उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत आहे. रासायनिक खते, किटकनाशके, बी-बियाणे यांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मजुरीचे दर सतत वाढत आहे. रासायनिक

खतामुळे शेती नापिक होत आहे. त्यामुळे उत्पादन खर्च भरुन निघत नाही. त्यामुळे निराशेपोटी शेतकरी आत्महत्त्या करीत आहे.

**३.शेतमालाच्या किंमतीतील अनिश्चितता :**

शेतमालाच्या किंमती ह्या मागणी पुरवठ्यानुसार ठरतात. हंगामाच्या काळात शेतमालाचा पुरवठा वाढतो तेव्हा किंमती घटतात. हंगाम संपल्यावर किंमतीत वाढ होते. किंमतीतील चढउताराचा फायदा शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांना होतो. शेतकऱ्यांच्या मालाचा भाव व्यापारी ठरवितो. शासनाची खरेदी केंद्रे वेळेवर सुरु होत नाहीत. त्यामुळे अशा परिस्थितीत मिळालेल्या उत्पन्नात शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही कधी कधी भरुन निघत नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्त्येचा मार्ग स्विकारतो.

**४. अकार्यक्षम धारण क्षेत्र :**

महाराष्ट्रातील धारण क्षेत्राचा आकार लहान झाल्यामुळे व्यापारी दृष्टीने शेती करणे परवडत नाही. शेतीत आधुनिक यंत्राचा वापर करणे खर्चिक असते. हा खर्च कमी धारण क्षेत्रावर करणे शक्य नसल्यामुळे पारंपारिक पद्धतीने शेती करणे भाग पडते. परिणामी उत्पन्न कमी मिळाल्यामुळे उत्पादन खर्च भरुन निघत नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे शक्य होत नसल्यामुळे शेतकरी आत्महत्त्येस प्रवृत्त होताना दिसून येते.

**५. आधुनिक तंत्रज्ञान, रासायनिक खते व बी-बियाणाचा अभाव :**

शेतकरी आजही पारंपारीक तंत्रज्ञानाच्या बियाणांचा वापर करत आहे. जुनाट तंत्रज्ञानामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होत नाही. पारंपारीक बियाणांत जास्त उत्पादन देण्याची क्षमता नसते. शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर व रास्त दराने मिळत नाही. वेळेवर बी-बियाणे, खते पाहिजे तसे मिळत नसल्यामुळे उत्पादन वाढत नाही.

**६. जागतिकीकरण :-**

जागतिकीकरणामुळे शेती अनुदानात मोठी घट झाली आहे. मुक्त आयातीच्या धोरणाचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. शेती आदानाच्या वाढत्या खर्चामुळे शेती उत्पादन खर्च वाढत आहे. परिणामी शेतकरी कर्जबाजारी होऊन त्यांच्यात नैराश्य वाढत आहे.

**७. जलसिंचनाच्या अपूऱ्या सुविधा :-**

महाराष्ट्रात आजही सिंचनाचे प्रमाण हे १८% एवढेच आहे. पुरेशा पावसाअभावी कोरडवाहू शेतीची उत्पादकता खुपच कमी आहे. अशा कोरडवाहू जमिनीवर शेतकऱ्यांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे शक्य होत नाही. वर्षानुवर्षे ही परिस्थिती बदलत नसल्याने नैराश्यातून शेतकरी आत्महत्त्या करत आहे.

**८. वाढती व्यसनाधिनता :-**

कर्जबाजारीपणा, गृहकलह, नापिकी, मुलाच्या शिक्षणाचा खर्च, मुलाचे विवाह या सारख्या कारणामुळे शेतकरी मद्यपानाकडे आकर्षित होतात. त्याच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा व्यसनावर खर्च होतो. कौटुंबिक खर्च व व्यसनावरील खर्चापायी तो सावकाराच्या कचाट्यात सापडून पुन्हा कर्जबाजारी होतो.

**९. कुटुंबातील आजारपण :-**

कुटुंबातील दारिद्र्यातून निकृष्ठ राहणीमान व कुपोषण यामुळे शेतकऱ्यांना गंभीर आजारांना तोंड द्यावे लागते. ग्रामीण भागात अपूऱ्या वैद्यकीय सेवा, औषधाच्या वाढत्या किंमती, अद्यावत शासकीय

रुग्णालयाचा अभाव, महागड्या खाजगी वैद्यकीय सुविधा इत्यादींमुळे कर्जबाजारीपणा वाढून शेतकरी आत्महत्येच्या मार्गाचा अवलंब करतो.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या रोखण्यासाठी उपाय :**

शेतकऱ्याच्या आत्महत्त्या रोखण्यासाठी शासनाने कर्जमाफी, व्याजमाफी, केंद्र व राज्य शासनाची वेगवेगळी पॅकेजेस अशा प्रकारचे उपाय केलेले आहेत. परंतु आत्महत्त्या थांबत नाही. आत्महत्त्येची अनेक कारणे लक्षात घेता या समस्येवर मात करण्यासाठी दिर्घकालीन शाश्वत उपायाची आवश्यकता आहे. त्या दृष्टीकोनातून खालील उपाय सांगता येईल.

१. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणे- अत्यल्प व अल्प भूधारक यासह सर्व शेतकरी आहेत त्यांना बँका व सावकारी कर्जातून मुक्त करण्यात यावे.

२. अल्पदरात कर्जपुरवठा- शेतकऱ्यांना अल्पदरात वेळेवर व पुरेसा कर्जपुरवठा करण्यात यावा.

३. शेतीपूरक व्यवसाय विकसित करणे - अलिकडच्या काळात महाराष्ट्रात शेती पूरक व्यवसाय नष्ट झाले आहेत. दुष्काळ किंवा नैसर्गिक संकट आले की, शेतकऱ्याला उत्पन्नाचा पर्याय राहत नाही. त्यासाठी दुग्धव्यवसाय, शेळीपालन, वराहपालन, कुक्कुट पालन, छोटेमोठे कुटीर उद्योग याला चालना देण्यासाठी शासनाने यासाठी अनुदान देऊन या व्यवसायाचा विकास केला पाहिजे.

४. योग्य बी-बियाणे व खते यांची उपलब्धता - शासनाने योग्य वेळी आवश्यक त्या प्रमाणात आधुनिक बी-बियाणे, खते, याची उपलब्धतता करुन दिली पाहिजे. यामध्ये शेतकऱ्यांची मोठी फसवणूक होते. ही फसवणूक थांबली तर आत्महत्त्या कमी होतील.

५. शेतमालाला हमीभाव - शेतकऱ्यांच्या सर्व पिकांना हमीभाव मिळण्यासाठी डॉ. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्यात यावी.

६. दर्जेदार आरोग्य सेवाची उपलब्धता - ग्रामीण भागात आजारपणामुळे शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणात होणारी वाढ थांबविण्यासाठी दर्जेदार शासकीय आरोग्य सेवाची उपलब्धता करण्यात यावी.

७. पुरेशा बाजारपेठा उपलब्ध करुन देणे - योग्य बाजारभाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्याचा उत्पादन खर्च देखील भरुन निघत नाही. त्यामुळे बाजारपेठेचा विकास करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची उपलब्धता करुन देण्यात यावी.

८. नियमित वीज पुरवठा - विजेच्या समस्येवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना स्वस्त, अखंड व पुरेसा वीज पुरवठा करण्यात यावा.

९. नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण - अतिवृष्टी, महापूर, दुष्काळ, नापिकी, गारपीठ अशा नैसर्गिक संकटापासून शेतकऱ्याचे झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी पुरेसा आकस्मिक निधी उभारण्यात यावा.

१०. शेतकऱ्यात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करावा - शेतकऱ्यात असलेले अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ठ रुढी परंपरा दूर करुन वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यात यावा.

११. शासनाने शेतकऱ्यांच्या मुलीच्या शिक्षणासाठी व लग्नासाठी अल्पदरात कर्ज उपलब्ध करुन द्यावे.

निष्कर्ष :-

शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत आहे, शेतीसंबंधी शासनाचे चुकीचे धो
नैसर्गिक आपत्ती, खते, बी-बियाणे यामध्ये शेतकऱ्याची पिळवणूक, फसवणूक, व्यापारी, दलाल
बाजारातील हस्तक्षेप यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात होणारी घट यामुळे शेतकरी कर्जबाजारी हो
व्यसनाच्या आहारी जाऊन नैराश्येपोटी आत्महत्त्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहे. शेतीत शा
सुधारणा करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात कृषी आधारीत उद्योगाचा विकास व शेतीपूरक व्यवसार
विकास केला तर शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबविण्यास मदत होईल.

## संदर्भ सूची :-

१. कृषी अर्थशास्त्र - डॉ. वसुधा पुरोहित - विद्या बुक्स् पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद २०१
२. अर्थसंवाद - मार्च २०१२ - खंड ३५ - अंक ४.
३. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - प्रा.डॉ. माधव बिराजदार - विद्या बुक्स् पब्लिशर्स, औरंगपू औरंगाबाद २०१२.
४. NCRB Various Year Report
५. भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. रायखेलकर, डॉ. दामजी - विद्या बुक्स् पब्लिशर्स, औरंगपू औरंगाबाद २०१२.

2018-19

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - I January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | मराठवाडयातील कृषी विकासात सिंचनाचे योगदान : विशेष संदर्भ लातूर जिल्हा<br>**डॉ. एस. एस. देवनाळकर** | ५५-५९ |
| १४ | भारतीय शेती तंत्रज्ञान : शाश्वत शेती<br>**डॉ. ढास डी. के.** | ६०-६५ |
| १५ | कोरडवाहू शेती आणि आय व व्यय<br>**प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे** | ६६-६९ |
| १६ | कृषी उत्पादकता - एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. अनंत नरवडे** | ७०-७६ |
| १७ | मराठवाडयातील कोरडवाहू शेती व पाणलोटक्षेत्र विकास<br>**डॉ. दीपक एम. भारती**<br>**मेघराज जनार्धन मोरे** | ७७-८२ |
| १८ | भूमी प्रदूषण कारणे परिणाम व उपाययोजना<br>**डॉ. जयदीप रामकृष्ण सोळुंके** | ८३-८८ |
| १९ | भारतातील कृषी उत्पादकता<br>**प्रा. डॉ. सुरेश टी. सामाले** | ८९-९३ |
| २० | जलयुक्त शिवार योजनेचा अभ्यास<br>**डॉ. ज्ञानेश्वर जिगे** | ९४-९७ |
| २१ | झिरो बजेट शेती काळाची गरज<br>**डॉ. के. एम. पवार** | ९८-१०१ |
| २२ | भारतीय शेतीची अल्प अत्पादकता : कारणे व उपाय<br>**प्रा. सी. एस. शेळके** | १०२-१०७ |
| २३ | शाश्वत कृषी विकास : आवश्यकता, समस्या आणि उपाय<br>**प्रा. डॉ. चव्हाण एम. एच.** | १०८-११३ |
| २४ | भुमी प्रदूषण कारणे व उपाय<br>**डॉ. कागदे बी. बी.** | ११४-११७ |

# २३. शाश्वत कृषी विकास : आवश्यकता, समस्या आणि उपाय

प्रा. डॉ. चव्हाण एम. एच.
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता. जि. बीड.

## प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात आर्थिक नियोजन, आर्थिक धोरणातून औद्योगीकरणावर भर देण्यात आला असला तरी भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व व स्थान घटलेले नाही. आजही भारतीय अर्थव्यवस्थेतील लोकसंख्येचा मोठा भाग उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. स्वातंत्र्यानंतर १९६० च्या दशकात झालेली हरितक्रांती आणि १९९१ नंतर नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रम या दोन घटनांनी शेतीचे संक्रमण निर्वाहपर शेतीतून व्यापारी शेतीत घडून आले. उत्पादनात वाढ करुन उत्पन्न मिळविण्याच्या तीव्र लालसेने शेतीत अतिरेकी मार्गाचा अवलंब करण्यात येत आहे. त्यामुळे शेतजमिनीचा कस कमी होऊन उत्पादनात घट होत आहे. जमिनीतील नैसर्गिक घटक सतत पीक घेण्यासाठी वापरले जात असून त्याची भरपाई न करता रासायनिक खताच्या अतिरेकी वापरामुळे उत्पादकता कमी होत आहे. कृषी उत्पादनात पाणी हा महत्त्वाचा अविभाज्य घटक आहे. पीक कोरडवाहू असो की बागायती पिकाच्या वाढीसाठी आवश्यक असणारे अन्न घटक जमिनीत अथवा खतात असतात. ते द्रव रुपात पिकात येण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. सिंचनासाठी भासणारी पाण्याची कमतरता आणि उपलब्ध पाण्यात वाढत असलेले क्षाराचे प्रमाण यामुळे शेती उत्पादनात घट होत आहे आणि पिकाचा दर्जाही घसरत आहे. रासायनिक खते व किटकनाशके यांच्या दुष्परिणामामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे. शेतीची उत्पादकता आणि पिकाचा दर्जा टिकवून ठेवायचा असेल तर शेतीचा संपूर्ण व्यवहार पर्यावरणपुरक असला पाहिजे यासाठी शाश्वत कृषी विकासाची आवश्यकता आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये

१. शाश्वत कृषी विकास संकल्पनेचा अभ्यास करणे.
२. शाश्वत कृषी विकासाच्या प्रक्रियेतील समस्येचा अभ्यास करणे.
३. शाश्वत कृषी विकासासाठी उपाय सूचविणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेण्यात आला असून त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, मासिके, त्रैमासिके, विविध अहवाल, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे इ. आधार घेऊन विश्लेषण केले आहे.

## शाश्वत शेती संकल्पना

शाश्वत शेती संकल्पना व्यापक स्वरुपाची संकल्पना आहे. शाश्वत शेती निसर्गाच्या विविध तत्त्वावर आधारीत आहे.